# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.10.2024** **वार – बुधवार**

---

**साखर**

राज्यातील साखर उद्योग आणि जोडधंद्यातील कामगारांच्या कराराची मुदत यावर्षी ३१ मार्चला संपली असूनही त्रिपक्ष समिती गठित करण्यात आली नाही. त्यामुळे त्वरीत ही समिती गठीत करावी अशी मागणी पुण्यातील महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय साखर कामगार संघाच्या शिष्टमंडळानं साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांच्याकडं केली आहे.

**पाणी**

पुणे महापालिकेच्या हद्दीजवळील ५ किलोमीटरच्या अंतरातील गावांना पाणी देणं महापालिकेला शक्य नसल्याचं पत्र महापालिका प्रशासनाकडून पीएमआरडीएला देण्यात आलं आहे. पुणे महापालिकेला; शहरासाठी पाणी पुरवठा करण्याकरिता सद्यस्थितीत २१ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. भामा आसखेड आणि खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातून महापालिकेला २०३२ पर्यंत १६ टीएमसी पाणीसाठा मंजूर आहे. त्यामुळे, आधीच शहरासाठी वाढीव पाणी, महापालिका दंड भरून घेत असल्यानं हद्दीलगतच्या गावांना पाणीपुरवठा करणं शक्य नसल्याचं महापालिकेनं कळवलं आहे.

**कसबा**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त कसबापेठ विधानसभा मतदार संघात स्वीप कार्यक्रमांतर्गत आप्पासाहेब जेधे कला वाणिज्य आणि शास्त्र महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आलं. 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' अशा घोषणा देण्यात आल्या.

**चिंचवड**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त चिंचवड रेल्वे स्थानकावर प्रतिभा महाविद्यालय, चिंचवड प्रवासी संघ, आणि दरूबाई सोशल फाऊंडेशन यांच्यावतीनं चिंचवड रेल्वे स्थानकांचे फलाट, आरक्षण केंद्र आणि पश्चिमेकडील तिकीट घर आणि परिसरात आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलाम अली भालदार यांनी उपस्थितांना स्वच्छतेविषयी शपथ दिली आणि आपल्या घराप्रमाणेच पुणे-लोणावळा परिसरातील रेल्वे स्थानकं, लोकल आणि एक्सप्रेस गाड्यांमध्ये स्वच्छता ठेवावी असं आवाहन केलं.

**हेलीकॉप्टर**

पुण्यात बावधन बुद्रुक गावाजवळ आज सकाळी एक हेलिकॉप्टर दाट धुक्यामुळं कोसळून तीन जण ठार झाले. अग्निशामक दलाच्या तीन गाड्यांनी मदत केली मात्र हेलिकॉप्टर जाळून खाक झालं होतं. मृतांमध्ये दोन वैमानिक आणि एक अभियंता असल्याची प्राथमिक माहिती आहे.

**जयंती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू सुरेश गोसावी यांनी; त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. जयंतीनिमित्त ललित कला केंद्र प्रस्तुत नाम महिमा या नामस्मरण विषयक भक्तिगीतांची मैफल झाली.

**स्वच्छता**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या चिंचवड इथल्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विज्ञान संस्थेत ‘स्वच्छता ही सेवा’ या देशव्यापी उपक्रमाअंतर्गत महादेव मंदिराच्या प्रांगणात स्वच्छता मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी संस्थेचे संचालक डॉक्टर शिवाजी मुंढे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचं महत्व सांगत, पर्यावरणाचं संतुलन आणि सुदृढ मानवी आरोग्यासाठी सर्वांनी स्वच्छतेच्या सवयींचा अंगीकार करण्याचं आवाहन केलं.

**कशाळकर**

संगीत क्षेत्रात संस्काराला अनन्यसाधारण महत्त्व असून शास्त्रीय संगीताच्या सादरीकरणाचं मर्म युवा कलाकारांनी समजून घेणं आवश्यक आहे, असं मत माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी पुण्यात व्यक्त केलं. भरत नाट्य संशोधन विद्यालयातर्फे डॉक्टर विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहोळ्यात ते बोलत होते. डॉक्टर कशाळकर यांचा सत्कार डॉक्टर सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉक्टर विकास कशाळकर यांच्या मैफिलीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**शिबीर**

पुणे जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात धनुर्विद्येचं दोन दिवसीय पंच - प्रशिक्षक शिबिर घेण्यात आलं. सहभागी शिबिरार्थींना धनुर्विद्या खेळाचं मार्गदर्शन, तांत्रिक प्रशिक्षण, धनुर्विद्येचे स्पर्धा पंच आणि नियम, खेळ मानसिकता विकास, आहार आदी विषयांवर तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आलं. यामध्ये जिल्ह्यातून 60 जणांनी सहभाग घेतला.

**रस्ते**

पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग २५ पुनावळे येथील वाढते उद्योग, नागरीकरणामुळे लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येला दळणवळणासाठी सोयीस्कर रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी शहरातील महत्त्वाच्या भागांना जोडणाऱ्या रस्त्यांची बांधणी आणि दुरुस्ती करण्याची विकास योजना महापालिकेने मंजूर केली आहे.

**पर्यटन**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सायन्स पार्क आणि तारांगणमध्ये शालेय विद्यार्थ्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. स्थापत्यशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राज्यातील गड-किल्ल्यांचं तैलचित्रांच्या माध्यमातून सादरीकरण केलं. या स्पर्धेत पुणे, पिंपरी-चिंचवड, शिरूर, भोर, इंदापूर या भागातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

**प्रदर्शन**

रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्रातर्फे आयोजित 'धागा' या स्वदेशी मेळ्याचं ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं असणार आहे.

**अंत्यविधी**

अंत्यविधीसाठी पारंपरिक लाकडं-गोवऱ्यांनी रचलेल्या चिता न वापरता गॅसदाहिनी किंवा विद्युत दाहिनीचा वापर करावा यासाठी "ग्रीन फेअरवेल' या अभियानाची काल सुरुवात झाली. हवेच्या गुणवत्तेसाठी कार्यरत असलेली "परिसर' ही नागरी संस्था, जागरुक नागरिक, संशोधक, वैद्यकीय व्यावसायिक आणि इतरांनी एकत्र येऊन तयार केलेल्या "पुणे एअर ॲक्शन हब' मार्फत पर्यावरणाचं हित लक्षात घेऊन अंत्यविधीसाठी गॅसदाहिनी किंवा विद्युतदाहिनीचा वापर करावा, असं आवाहन संस्थेनं केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज विजांच्या कडकडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.  उद्या आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**